# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

## Date: 19 June 2024

## Time: 01.00 to 01.05 PM

## Language Marathi

## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर

## प्रादेशिक बातम्या

## दिनांक: १९ जून २०२४ दुपारी १.०० वा.

****

बिहारमध्ये राजगीर इथल्या नालंदा विद्यपीठाच्या नवीन परिसराचं उद्घाटन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते आज झालं. १७ देशांच्या राजदूतांसह अनेक मान्यवर यावेळी उपस्थित होते. नालंदा हे केवळ भारताच्या भूतकाळाचं पुनर्जागरण नाही, तर जगातल्या आणि आशियातल्या अनेक देशांचा वारसा त्याच्याशी जोडलेला असल्याचं पंतप्रधान यावेळी म्हणाले. येत्या काळात नालंदा विद्यापीठ पुन्हा एकदा आपल्या सांस्कृतिक देवाणघेवाणीचं प्रमुख केंद्र बनेल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

तत्पूर्वी पंतप्रधानांनी विद्यापीठ परिसरात वृक्षारोपण केलं आणि २०१६ ला संयुक्त राष्ट्र वारसा स्थळ म्हणून घोषित केलेल्या नालंदा विद्यापीठ परिसरातल्या भग्नावेषांची पाहणी.

****

येत्या २१ तारखेला साजरा होणाऱ्या आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शशांकासनाची माहिती देणारी एक चित्रफित आज सामाजिक माध्यमांवर सामायिक केली आहे. या आसनाचा सराव करण्याचं आवाहन त्यांनी केलं आहे.

दरम्यान, आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त मुंबईत मंत्रालयाच्या त्रिमूर्ती प्रांगणात योगासन शिबिराचं आयोजन करण्यात आलं आहे. या शिबिरास मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासह सर्व मंत्री उपस्थित राहणार आहेत.

****

महाराष्ट्रात भाजपचे नेते उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हेच असून, तेच राज्याचं नेतृत्त्व करतील, अशी माहिती पक्षाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिली. ते आज नागपूर विमानतळावर वार्ताहरांशी बोलत होते. सर्व विधिमंडळ सदस्यांनी

आणि प्रदेश भाजपाने देवेंद्र फडणवीस यांना सरकारमध्येच राहून संघटनेला मदत करण्याची विनंती केली असल्याचं त्यांनी सांगितलं. लोकसभा निवडणुकीत मतदारांनी दिलेल्या पाठबळाबद्दल धन्यवाद व्यक्त करण्यासाठी महाराष्ट्रात भाजपा जुलै महिन्यात धन्यवाद यात्रा काढणार असल्याची माहिती बावनकुळे यांनी यावेळी दिली.

****

येत्या विधानसभा निवडणुकांसाठी मतदान केंद्रातलं अंतर कमी करण्यासह मतदान केंद्रांची संख्या वाढवण्याचा आग्रह भारतीय जनता पक्ष निवडणूक आयोगाकडे करणार असल्याचं पक्षाचे प्रदेश सरचिटणीस विजय चौधरी यांनी सांगितलं आहे. ते काल धाराशिव इथं वार्ताहर परिषदेत बोलत होते. आगामी काळात भाजपकडून मतदार यादीत दुरुस्ती आणि नव मतदारांची नाव नोंदणी यावर विशेष भर दिला जाणार असल्याचंही त्यांनी सांगितलं. आंतरराष्ट्रीय योग दिन, शामा प्रसाद मुखर्जी जयंती आणि पुण्यतिथी यासह मन की बात या कार्यक्रमाचा प्रसार, आदी कार्यक्रम पक्षातर्फे राबवण्यात येणार असल्याचं त्यांनी सांगितलं.

****

नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्पाच्या दुसऱ्या टप्प्याचा मंजुरीचा प्रस्ताव तातडीने मंत्रिमंडळाच्या मान्यतेसाठी सादर करावा, असे निर्देश कृषीमंत्री धनंजय मुंडे यांनी दिले आहेत. यासंदर्भातल्या आढावा बैठकीत ते काल बोलत होते. या योजनेच्या दुसऱ्या टप्प्यात सहा हजार ९५९ गावांचा समावेश असून, यासाठी जागतिक बँक अर्थसहाय्य करणार आहे. शेतकऱ्यांना आर्थिक आधार देणाऱ्या आणि विद्यापीठांनी विकसित केलेला छोट्या यंत्रांचा वापर होण्यासाठी सुद्धा या प्रकल्पातून प्रयत्न व्हावेत अशी अपेक्षा मुंडे यांनी यावेळी व्यक्त केली.

****

जागतिक सिकलसेल दिवस आज पाळण्यात येत आहे. देशभरात आजपासून तीन जुलै पर्यंत विशेष सिकलसेल निर्मूलन मोहीम राबवण्यात येत आहे. यानिमित्त आज नंदुरबार शहरात जिल्हा आरोग्य प्रशासन आणि आयएमएच्या वतीन जनजागृती रॅली काढण्यात आली. शहरातले प्रमुख डॉक्टर्स, नर्सिंग मह.वद्यालयाचे विद्यार्थी आणि नागरीकांनी मोठ्या संख्येनं या रॅलीत सहभाग घेतला होता.

****

बुलडाणा जिल्हा स्त्री रूग्णालयात राष्ट्रीय तंबाखू नियंत्रण कार्यक्रमांतर्गत तंबाखू, गुटखा आणि तंबाखूजन्य पदार्थ खाताना आढळलेल्या ११ जणांवर दंडात्मक कारवाई करण्यात आली. यामध्ये एक हजार ६०० रुपयांचा दंड वसूल करण्यात आला.

****

महिला क्रिकेटमध्ये भारत आणि दक्षिण आफ्रिकेदरम्यान भारतात सुरु असलेल्या तीन एकदिवसीय क्रिकेट सामन्यांच्या मालिकेतला दुसरा सामना आज बंगळुरु इथं होणार आहे. या मालिकेत भारत एक – शून्यनं आघाडीवर आहे. या मालिकेनंतर दोन्ही संघात एक कसोटी सामना आणि तीन टी – ट्वेंटी क्रिकेट सामन्यांची मालिका होणार आहे.

****

टी – ट्वेंटी क्रिकेट विश्वचषक स्पर्धेत सुपर एट मधले सामने आजपासून सुरु होत आहेत. पहिला सामना दक्षिण आफ्रिका आणि अमेरिकेदरम्यान होणार आहे. भारतीय वेळेनुसार रात्री आठ वाजता या सामन्याला सुरुवात होईल. भारताचा सुपर एट मधला पहिला सामना उद्या अफगाणिस्तानसोबत होणार आहे.

****

हवामान

येत्या दोन दिवसात कोकणात बहुतांश ठिकाणी, मध्य महाराष्ट्र आणि विदर्भात काही ठिकाणी, तर मराठवाड्यात तुरळक ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता पुणे वेधशाळेनं व्यक्त केली आहे.

****